The purposive sampling method is used to select article for review process. While searching article certain keywords are take in to mind like Continuing Professional development, Professionalism, College Librarians

**Limitations of Study:**

The articles selected for review purpose are collected from online sources only. The articles are written on Continuing Professional development

**Need of CPD:**

"Taking in to account the speed of changes in librarianship, the practising librarian would need some kind of professional training after obtaining their formal education"(Horvat,2004)

Though working librarian completed his/her professional training in some school of library science. Though the life of degree which he/she acquire is forever, but the knowledge and skill what he/she acquired is not forever .Averagely after five year knowledge get updated and required skills are changed. UGC and AICTE, ICMR are the apex body of education in that particular field of education. These apex bodies make compulsory CPD to teachers and librarian. Without completed that particular CPD they are promoted through carrier advancement scheme i.e. CAS. So the professionals are needed to complete CPD.CPD ensures that professionals are up-to-date which help professionals to progress in their profession, they get senior post and advanced salary.CPD provide facility for college librarian to check their current knowledge and skill and up to date knowledge and skill which scarce in them.

Professionals like doctors, nurses, lawyers, chartered accountant, and teachers update their knowledge. These profession are for serving society, society trust them because society felt that these professionals having proper knowledge and skill to help them as per their profession. It is no dought today that librarianship is profession or not? Librarianship is profession in all concern. Society trust librarian for proper information, reading material .As ways of providing information, management of library get updated, it is duty of each college librarian to update their knowledge and skill so that they properly serve their society .Dinosaurs were largest animals on earth, but they not alive because they not adjusted to changing environment. Like this if librarian do not adjust to this changing environment of digital technology and all that, will disappear. College, university, UGC or other funding agencies provide funds for library development. If librarian has no knowledge how to upgrade services and facilities of library, then how can they utilize funds in better way? So it is duty of every college librarian to update knowledge and skill and provide better service to users of library.

**Benefits of CPD:**

CPD provide benefits to us on three different layer i.e. personal benefits, organizational benefits and professional benefits.

**Personal benefits:**

If college librarian regularly engages in our professional development activity, it will give him immense pleasure. As he more involved in his job, he will want more learn. CPD

provide chance to college librarian for getting this pleasure. It will also improve the confidence of college librarian. As CPD make able college librarian to handle new emerged technologies .This results in less the stress and increase self-confidence of librarian and also self esteem get increase. It is human tendency what he learns, he loves it more and search new things among it. New ideas may emerged in his brain due to learning process.CPD provide us new idea he will provide his services more better way. Current era is skill era ,the candidate who posses more skill, more chance for career development.CPD provide confidence to college librarian for better services of library to users. Users get satisfy with services of librarian and they respect him more than before.

**Organizational benefits:**

Any library not builds only by physical infrastructure equally or more important that is human resources. Best librarian is the valuable property of any library. CPD makes librarian best. This indirectly gives benefits to organization. Due CPD activity librarian get knowledge and skill and he become more productive for library. Librarian becomes leading examples for students and other teachers. CPD provide new knowledge and skill to librarian and this provide benefit to library that more users get attracted towards library. College can benefit of that for the promotional activity of college.

**Professional benefits:**

CPD provide up to date knowledge and skill to librarian, this help to maintain standards in profession. Librarian can provide library services as per standards. Librarian gets advanced knowledge and skill by participating in CPD activities. As librarian provide better service to users, so they get confidence that library can fulfil their need of information and other library services.

**Barrier to CPD:**

Though there are numerous benefits of CPD. But there are lot of barrier also, that barriers hinder to continuing professional development of college librarian. Lack of funds and resources is the major issue in India. It is not possible for any institution and university to develop CPD program without funds and resources. In western countries CPD programs are more as compare to India. For developing CPD program that level of experienced ,trained and skilled staff required but if there is scarcity of this staff in institution and university then how can develop CPD.? Fear and lack of confidence is psychological barrier for developing CPD program. If persons in institutions and university felt that they are no much competent in developing such CPD program they don't CPD program, though there is adequate funds available for CPD.

If librarian working in library having heavy work load then he/she will not take interest in participate in such professional development program. In most of library solo librarian work then how he participates in CPD, because serving to users is the first priority of any working librarian. If CPD program not available in local area or available programs are not tailored as per his/her need then also he/she not takes interest in participating such CPD program. Lack of IT resources and lack of skills of using those resources is also barrier in case of online resources. Many college librarians do not know what the knowledge and skill gap are. So they do not approach towards ongoing CPD program.

**Ways to CPD for College librarian:**

There are numerous way by using it college librarian can participate in CPD program. Orientation and Refresher program are easy way for CPD. UGC provide funds for these program .College librarians can go to any HRDC centre and complete this program. These programs are generally two or three week of period. Eminent personalities of subjects invited there for delivering lectures. Some assignments also have to complete during course. These assignments are for development of skill and knowledge which catch during course. Seminars, conference and workshop are also one of way of CPD for college librarian. Professional associations, universities and colleges organise these activities for professional improvements of staff. Participants actively participate in such activities, eminent speakers address the participant, participant can learn from other participant also. Some universities or institution organise certificate, degree level course for professional development of college librarian. The courses may be distance or regular mode. IGNOU one of the renowed university in India provides courses for working librarian through distance mode. Many College librarians completed the course like PGDLAN from IGNOU .Institutes like Bedekar College, Thane, Tata Institute of Social Sciences provide facility for such courses. Various online training programs now available for CPD. MOOCs course provide free or acquire nominal fee for such courses. Some organization organise professional development program for college librarian these are on the job training program. Some college librarian learn skills through self learning method ,by taking help of their friends,colleagues,or by using trial and error they learn new skills.

**Why online mode for CPD:**

Though there are various modes for continuing professional development activities, online mode is more convenient and effective way for professional development activities. College librarian can learn from experts across the world. No geographical boundaries are for online mode of learning. Online resources provide one to one or one to many broadcasts. Communication facility. College librarian can learn as per his/her convenient time and space. So it is very convenient for working college librarian. They can learn new knowledge and skill along with performing their duties in college.

RESEARCH JOURNEY

Online resources provide facility of hypertext. Learner can directly go to the text what he/she want to study. Learner can see the video, read the text many times as per his/her understanding capacity. Learner can switch from data source to another data source just by one click. Online learning especially learning from MOOCs is very cost effective. MOOCs provide learning material free of cost or charge very small amount.

**Conclusion:**

CPD provide enormous opportunities to every professional for development in their respective subject of interest. CPD provide opportunities include both formal and informal learning. Every profession need to update knowledge and skill. Role of librarian change from custodian to digital librarian.CPD program help college librarian for maintain, enhance knowledge and skill levels. Librarianship is profession which need to update skill and knowledge for better services to its users. Any organization not enriched by its physical resources, but human resources is equally important. And human resources are enriched by continuing professional development, means indirectly CPD program enrich organization. There are some

E-ISSN : 2348-7143
Nov.- 2021

barriers which hinder CPD .But now there is online way by using that professionals can update their skills and knowledge.

**References:**

1. Ai-Ling, Y. (2009). Continuous Professional Development for Librarians. Journal PPM, 3, 33–44.
2. Day,C.(1999).Developing Teachers :The challenge of lifelong learning .London: Falmer Press,4 .
3. Horvat,A.(2004).Continuing education of librarians in Croatia :Problems and Prospects. New Library World,15(1204/1205),370.375.
4. Kennedy, A. (2005). Models of Continuing Professional Development: A framework for analysis. Journal of In-Service Education, *31*(2), 235–250.
5. Ritchie, A., & Genoni, P. (1999). Mentoring in professional associations: continuing professional development for librarians. Health Libraries Review, *16*(4), 216–225.
6. Rose, J., & Reynolds, D. (2002). Teachers' Continuing Professional Development: A New Approach. Teachers' Continuing Professional Development: A New Approach, August, 219–240.
7. Wee, B., Shepardson, D., Fast, J., & Harbor, J. (2007). Teaching and learning about inquiry: Insights and challenges in professional development. Journal of Science Teacher Education, *18*(1), 63–89.

Impact Factor – 6.625

E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

July-August-September 2020

Vol. 7 Issue 3 (B)

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts, Science & Commerce College,
Harsul, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

Cover Photo : Hathras Rape Case (U.P. India) Source : Internet

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 1000/-

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Vol. 7, Issue 3 (B)
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
July-Aug.-Sept. 2020

# स्वामी विवेकानंदाची ज्ञानाची संकल्पना

आदिनाथ दरंदले
ग्रंथपाल,
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
कोल्हार बु., अहमदनगर. मो. ८८३०५९५७००

डॉ. हेमकांत चौधरी
ग्रंथपाल,
श्रीमती. एच.आर.पटेल, कला महिला महाविद्यालय,
शिरपूर, धुळे.

## प्रस्तावना

स्वामी विवेकानंद यांचे ज्ञानशास्त्र मनाच्या एका अवस्थेच्या कल्पनेवर आधारीत आहे. ज्ञान हे बाहेरून येत नाही, आपण बाहय जगातून केवळ माहिती जमवू शकतो. ज्ञान हे केवळ माणसाच्या आतंरमनातून व्यक्त होते. शिक्षणाव्दारे केवळ माहितीचा संग्रह करणे म्हणजेच ज्ञान प्राप्ती नव्हे. तर त्या माहितीव्दारे प्राप्त विचार आत्मसात करून त्याव्दारे जीवन निर्मिती व चारित्र्य निर्मिती करणे आवश्यक आहे. केवळ दुसऱ्यांचे विचार पाठ करून पदवी घेणे म्हणजे ज्ञान प्राप्ती नाही तर ते विचार आत्मसात करून त्याला प्रतिसाद म्हणून आपल्या अंतरमनातून विचार प्रकट होणे म्हणजे ज्ञानप्राप्ती होय.

## ज्ञान प्राप्तीचा मार्ग

ज्ञान प्राप्तीचा एकमेव मार्ग म्हणजे एकाग्रता होय. एकाग्रता हा ज्ञानाचा पाया आहे. एकाग्रतेच्या अभावी काहीही करता येणार नाही.[1] असे स्वामी विवेकानंद म्हणत यासाठी त्यांनी स्वतःचेच एक उदाहरण दिलेले आहे. जयपूरला असतांना एक व्याकरण तज्ञाशी त्यांचा परिचय झाला तिन दिवस त्या महापंडीताने त्यांना व्याकरण शिकवूनही त्यांना त्याचा पुरता अर्थ समजला नाही परंतू एकाग्र चित्ताने त्यांनी केवळ तीन तासात ते संपूर्ण व्याकरण समजून घेतले विवेकानंद म्हणतात मन एखादया विषयावर एकाग्र केल्यानंतर ते तेथून इच्छेनुसार काढून घेण्याची शक्ती आपल्या ठिकाणी नसते म्हणून एकाग्रतेच्या वाढीबरोबर मन काढून घेण्याच्या शक्तीतही वाढ करणे आवश्यक आहे. ते आपल्या इच्छेनुसार दुसऱ्या विषयावर स्थिर करता आले पाहिजे.

एकाग्रता हा सर्व प्रकारच्या ज्ञानाचा पाया आहे. तिच्या अभावी काहीच करता येत नाही, सामान्य माणूस नव्वद टक्के विचारशक्ती या एकाग्रतेच्या अभावी वाया घालवतो व त्यामुळेच त्याच्याहातून चूका होतात. असे स्वामी विवेकानंद म्हणत मन एकाग्र होते व अंर्तमुख होवून जेव्हा मे स्वतःवरच केंद्रित होते तेव्हा आंतरमनातून ज्ञानाचा झरा वाहण्यास सुरूवात होते.[2]

मन एकाग्र करणे व नंतर या एकाग्र मनाने त्याच्याच अगदी आतल्या कप्यात काय चालले आहे हे शोधणे व नंतर तिथे काय गवसते त्यावर काही सामान्य निष्कर्ष काढणे व अखेर तद्नुसार स्वतःच एखादा सिध्दांत बसविणे म्हणजे ज्ञान प्राप्ती होय.[3]

## मनाच्या एकाग्रतेसाठी स्वामी विवेकानंदानी सांगितलेले उपाय :—

१. ओमकाराचा वारंवार जप करणे व त्याच्या अर्थाचे मनन करणे असे केल्याने हृदयात ज्ञान प्रकट होईल आणि आत्मसाक्षात्कार घडेल.
२. व्यर्थ बडबड व रटाळ वाङ्मय वाचण्यापेक्षा ईश्वरविषयक ग्रंथ वाचावेत.
३. अभ्यासकाने आहारासंबंधी काही नियम पाळणे आवश्यक आहेत. शुध्द, सात्विक व शाकाहारी आहार हा मन एकाग्रतेसाठी तारक आहे तर अशुध्द, असात्विक व मांसाहार हा मारक आहे. यासाठी त्यांनी

हत्ती या शुध्द शाकाहारी व सिंह, वाघ या शुध्द मांसाहारी प्राण्यांची तुलना करून दाखवली आहे. आहार हा मितआहार असावा अधिक खाणे तसेच अधिक उपवास करणे दोन्हीही ज्ञान प्राप्तीसाठी घातक आहेत. अधिक उपवासाने शरीर दुर्बल होते व शारिरीक शक्तीबरोबर मानसिक शक्तीचाही ऱ्हास होण्यास सुरूवात होते. अतिउपवासाने स्मरणशक्ती क्षीण होवून जाते. म्हणून ज्ञान प्राप्ती करू इच्छा असणाऱ्याने अतिउपवास करू नये.[४]

४. विलासीपणा हा सुध्दा अभ्यासकासाठी अपायकारक आहे.

५. ज्ञान आंतरमनातून प्रकट होण्यासाठी स्वामी विवेकानंदानी नाडीशुध्दी, प्राणायाम, इडेने व कुंडलिनी शक्तीला जागृत करणे या पायऱ्या सांगितलेल्या आहेत. नाडीशुध्दी करीता श्वास एका नाकपूडीने आत घेणे व दुसऱ्या नाकपूडीने बाहेर सोडणे या क्रिया दिवसातून चार वेळा कराव्यात. प्रत्येक वेळेस तीनदा किंवा चारदा ही क्रिया करावी असे सुचविले आहे. सलग पंधरा दिवस केल्याने नाडीशुध्दी होते. त्यानंतर प्राणायमाचा अभ्यास करावा यामध्ये पहिली क्रिया म्हणजे मोजक्या प्रमाणात श्वास घेतांना व सोडतांना ओमकाराचा किंवा दुसऱ्या एखादया पवित्र शब्दाचा मनातल्या मनात उच्चार करावा यानंतर येणारी क्रिया म्हणजे इडेने यामध्ये एका नाकपुडीने श्वास आत घेवून फुफ्फुसे भरा व त्यावबरोबर ज्ञानतंतूवरही लक्ष केंद्रित करा व नंतर दुसऱ्या नाकपुडीने श्वास हळुहळू बाहेर सोडा यानंतरची क्रिया म्हणजे कुंडलिनी जागृती विवेकांनदानी सांगितलेली आहे. स्वामी विवेकानंद म्हणतात कुंडलिनी जागृत झाल्यानंतर तुमचे मन तुमच्यादृष्टीने अनंत ज्ञान भरलेले होवून जाईल.[५]

६. ध्यान साधना करणे हे ज्ञान मिळवण्याचे सोपे साधन आहे. असे स्वामी विवेकानंद म्हणतात यासाठी मोतीशिंपल्यांचे उदाहरण दिलेले आहे. जसा मोतीशिंपले स्वाती नक्षत्रामध्ये पावसाचे पाणी पिण्यासाठी आ वासून पृष्ठभागावर तरंगत राहतात. स्वाती नक्षत्राच्या पावसाचा एक थेंब आत पडताच हे मोतीशिंपले झटकन आपले कवच मिटतात आणि थेट समुद्राच्या तळाशी दडी मारून बसतात व तिथे सावकाश त्या थेंबाचा मोती करण्यात गुंतून जातात. विवेकानंद म्हणतात आपण त्या मोतीशिंपल्यासारखे झाले पाहिजे प्रथम ऐका, नंतर समजून घ्या आणि मग, ज्यांनी चित्तविक्षेप होईल अशा सर्वगोष्टींपासुन दूर राहुन, बाहय जगातील दृष्टी अजिबात काढून घेवून बाहय वस्तूंचे आकर्षण अजिबात झिडकारून स्वत:च्या अंतर्यामीच्या सत्याचा विकास करण्यात गढून जा. मनाचा चंचलपणा सोडून एक कल्पना घ्या आणि ती तडीस जाईपर्यंत तीच घेवून राहा त्यातुन एक नवीन ज्ञानप्रकाश तुम्हाला दिसेल.

७. मन जेव्हा एकाग्र होते व अंर्तमुख होवून जेव्हा ते स्वत:वरच केंद्रित होते तेव्हा आपल्यातील सर्व शक्ती आपल्या दास बनतात.

८. स्वत:ला कधीही कमी लेखू नका. स्वत:ला पापी समजू नका.

९. आपण स्वत: सर्वकाही करू शकता हा आत्मविश्वास सदैव बाळगा, फक्त स्वत:वरच श्रध्दा ठेवा.

१०. ज्ञानप्राप्तीसाठी कमालीची चिकाटी हवी प्रचंड इच्छाशक्ती हवी, खूप मनोबल हवे.

११. स्थिर बुध्दीचे व्हा. स्वत:शी पूर्णपणे प्रामाणिक रहा.

१२. शारिरीक, बौध्दीक व आत्मिक दौर्बल्य उत्पन्न करणारे जे–जे आहे त्याचा त्याग करा.

१३. स्वामी विवेकानंद म्हणतात आपण पोपटाप्रमाणे पुष्कळ गोष्टी बोलतो पण त्यांच्यापैकी एकही प्रत्यक्ष कृती करत नाही. हे ज्ञान प्राप्तीसाठी घातक आहे.

१४.शारिरीक दुर्बलता असलेल्या व्यक्तीचा मेंदू काहीच करू शकत नाही अगोदर शारिरीक दुर्बलता नष्ट करावी, त्याव्दारे मानसिक दुर्बलता कमी होण्यास मदत होईल. स्वामी विवेकानंद म्हणतात गीतेच्या अध्ययनापेक्षा फुटबॉल खेळून तुम्ही स्वर्गाच्या अधिक निकट पोहचू शकता. म्हणून अगोदर शरीर बलवान बनवा म्हणजे मेंदू अधिक तल्लख होवून अधिक आकलन होईल व ज्ञानार्जनाची क्षमता नक्कीच वाढेल.[६]

ज्ञान प्राप्तीसाठी स्वामी विवेकानंदानी सांगितलेला अष्टांग योग

ज्ञान प्राप्तीसाठी विवेकानंदानी अष्टांग योग सांगितलेला आहे. अष्टांग योग म्हणजे आठ प्रकारचे योग ते पुढीलप्रमाणे आहेत.

१. पहिला यम – हा सर्वात महत्वाचा आहे. त्याने सर्व जीवनाला नियंत्रित करावयाचे आहे. त्याचे पाच विभाग आहेत.
   अ. विचार, शब्द व कृती यांनी कोणाचीही हिंसा न करणे.
   ब. विचार, शब्द व कृती यांच्याव्दारे लोभ न बाळगणे.
   क. विचार, शब्द व कृती यांना पूर्णपणे पवित्र ठेवणे.
   ड. विचार, शब्द व कृती यांच्या बाबतीत पूर्णपणे सत्यनिष्ठ राहणे.
   इ. दान ग्रहण न करणे. ;अपरिग्रहद्ध
२. दुसरा नियम – शरीराची निगा, आहारविषयक नियमांचे पालन करणे.
३. तिसरा नियम – अध्ययनाच्यावेळी आसन, कटिभाग, खांदे व डोके ही सरळ ठेवली पाहिजे. पाठीचा कणा मोकळा असला पाहिजे.
४. चौथा नियम – प्राणायाम, प्राणावर प्रभुत्व मिळविण्यासाठी श्वासावर नियत्रण ठेवावे.
५. पाचवा नियम – प्रत्याहार मन अंर्तमुख करून त्याला बर्हिमुख होवू न देणे आकलनासाठी ते मनातल्या मनात घोळवत राहणे.
६. सहावा नियम – धारणा एका विषयावर मन एकाग्र करणे.
७. सातवा नियम – ध्यान मनाला स्वतःकडे परत वळवून स्वतःतच केंद्रित करणे.
८. आठवा नियम – समाधी आपल्या साऱ्या प्रयत्नांचे उद्दिष्ट असलेली ज्ञानप्राप्ती होणे.
   ज्ञान प्राप्त करू इच्छिणाऱ्याने यम व नियम यांचा अभ्यास जन्मभर करावा असे सुचविले आहे.[७]

सारांश –

स्वामी विवेकानंद केवळ माहितीच्या भेंडोळयाला ज्ञान समजत नाही दुसऱ्यांचे विचार केवळ ऐकून आपण ज्ञानी होत नाही तर ते विचार ग्रहण केल्यानंतर आपल्या आंतरमनातून जे प्रकट होईल व त्याव्दारे जीवन निर्मिती, मनुष्य निर्मिती व चारित्र्य निर्मिती होईल ते म्हणजे ज्ञान. ज्ञान म्हणजे आपल्या मनाचे सृजन होय. आंतरमनातून ज्ञान प्रकट व्हावयाचे असेल तर मनाला एका ठराविक पातळीपर्यंत एकाग्र करता आले पाहिजे. एकाग्रता हा सर्व ज्ञानाचा पाया आहे. मन एकाग्र होने व अंर्तमुख होवून जेव्हा ते स्वतःवरच केंद्रित होते तेव्हा आंतरमनातून ज्ञानाचा झरा वाहण्यास सुरूवात होते.

संदर्भ –

१. मुजुमदार सत्येंद्रनाथ – स्वामी विवेकानंद यांचे चरित्र, रामकृष्ण मठ, नागपूर, २०१६, पृ.क्र.१.२१

2- Concept of knowledge, Swami Suparananda secretary, The Ramkrishna Institute of culture Kolkata 2000, P-vii-vii

३. स्वामी विवेकानंद – ज्ञानयोग, स्वामी ब्रम्हस्थानंद अध्यक्ष, रामकृष्ण मठ, धंतोली २०१६, पृ.क्र.१.२५

४. स्वामी विवेकानंद – स्वामी विवेकानंद का शिक्षा दर्शन, बुक पब्लिशिंग हाऊस, दिल्ली २०१६ पृ.क्र.१४

५. स्वामी विवेकानंद – शिक्षण, स्वामी ब्रम्हस्थानंद अध्यक्ष, रामकृष्ण मठ, धंतोली २०१५, पृ.क्र.१.७

६. स्वामी विवेकानंद – भारतीय व्याख्याने, स्वामी ब्रम्हस्थानंद अध्यक्ष, रामकृष्ण मठ, धंतोली २०१५, पृ.क्र. ४१८.४२२

७. स्वामी विवेकानंद – ज्ञानमार्गावरील प्रवचने, स्वामी ब्रम्हस्थानंद अध्यक्ष, रामकृष्ण मठ, धंतोली २०१६, पृ.क्र. १.५

RNI MAHMAR.43768/18/12/2013.TC Vol.6, Issue : VIII, August, 2020

MONTHLY PEER REVIEWED JOURNAL ISSN No. 2454-8731

# Rankranti Multidisciplinary Research Journal




*Chief Editor*
**Dr. Umesh B. Pujari**

*Executive Editor*
**Dr. Amit H. Raut**

Chaitanya Prakashan, Nanded – 431606 rmrjournal@gmail.com

# Rankranti Multidisciplinary Research Journal

ISSN No. 2454-8731

*Chief Editor*
**Dr. Umesh B. Pujari**

*Executive Editor*
**Dr.. Amit H. Raut**

# अनुक्रमणिका


| अ.क. | संशोधन विषय | लेखकाचे नाव | पान क. |
|---|---|---|---|
| 1 | ताण व्यवस्थापन तंत्राचा अभ्यास | प्रा. विशाल पवार | 01 -06 |
| 2 | कोरोना विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावाचे आणि टाळेबंदीचे जनजीवनावरील प्रभाव (विशेष संदर्भ महाराष्ट्र )राज्य | प्रा. किरण नाईकनवरे | 07 - 16 |
| 3 | कोरोना काळ आणि मराठी भाषा | प्रा. साजिद के. शाह | 17 - 29 |
| 4 | आदिवासी आत्मकथन 'आदोर' एक दृष्टिक्षेप | श्री. दत्तात्रय आसवले | 30 - 34 |
| 5 | भारतातील स्त्री समाजसुधारक पंडिता रमाबाई यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदानः एक अभ्यास | डॉ. सौ. वंदना राजेश शिंदे | 35 - 45 |
| 6 | फेसाटी : एक आकलन | डॉ. विलास धनवे | 46 - 50 |
| 7 | गायनाचार्य पंडित विष्णू दिगंबर : चरित्रातून घडणारे चरित्र नायकाचे व्यक्तिमत्व दर्शन | तेलौरे मनोज | 51 - 58 |
| 8 | बाप नावाची माय : संघर्षमय यशोगाथा | डॉ. दत्ता रूस्तुमराव शिंदे | 59 - 65 |
| 9 | महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्रातील महिलांच्या समस्यांचा अभ्यास | डॉ. शिवाजी पाते व गंगाधर गायकवाड | 66 - 75 |
| 10 | महाराष्ट्रातील मनरेगा योजनेचा आढावा (इ.स. 2011 ते 2016) | डॉ. सोनाजी पतंगे व गंगागौरी गायकवाड | 76 - 84 |
| 11 | महाराष्ट्रातील घरेलू कामगार महिलांच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास | मनेष खटावे | 85 - 93 |
| 12 | अहिल्याबाई होळकर – पेशवे संबंध : एक अभ्यास | योगेश किनकर | 84 - 98 |
| 13 | शाश्वत विकासाची संकल्पना | प्रा. रमेश माने | 99 - 103 |
| 14 | भारतीय कृषी क्षेत्रावर कोविड–19 चा प्रकोप. एक अभ्यास | डॉ. जितेंद्र तलवारे व जगदिश कुवर | 104 - 114 |
| 15 | किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या प्रमाणिकपणा व मुल्यस्थितीभान यांचा तुलनात्मक अभ्यास | डॉ. मनोज बोराटे | 115 - 121 |
| 16 | अण्णाभाऊ साठे : एक सिध्दहस्त कथाकार | डॉ. नामदेव सोडगीर | 122 - 128 |
| 17 | महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांचे उत्सव आणि अख्यायिका | डॉ. नवनाथ शिंदे | 129 - 137 |
| 18 | भारतीय जलव्यवस्थापनात बाराव स्थापत्याचे महत्व | डॉ. आर. आर. पिपळपले | 138 - 144 |
| 19 | लॉकडाऊनच्या काळातील पर्यावरणातील सकारात्मकता – एक अभ्यास | डॉ. रंजीता डी. जाधव | 145 - 150 |
| 20 | सार्वजनिक ग्रंथालयाचा वार्षिक अहवाल एक अभ्यास | प्रा. दत्ता पवार | 151 - 155 |

Rankranti Multidisciplinary Research Journal ISSN: 2454-8731

# महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांचे उत्सव आणि आख्यायिका

प्रा.(डॉ.) नवनाथ अंगद शिंदे

(एम्.ए.,बी.एड्.,सेट,नेट,एम्.फिल.,पीएच.डी.,बी.जे.)

सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,

लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील(पद्मभूषण उपाधिने सन्मानीत)

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे,कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,सात्रळ.

ता. राहुरी, जि. अहमदनगर .413711.,

**सारांश :**

महाराष्ट्रातील प्रमुख दैवतांचा अभ्यास देशी.विदेशी संशोधकांनी आजवर मांडला आहे. आजही अनेक संशोधक अशा अभ्यासात रंगले आहोत. विशेषतः दैवतांच्या स्वरुपात मानवी मनोव्यापाराचं अन् जीवनक्रमाचं फार मोठ संचित सामावलेलं असल्यामुळे, दैवतांचा अभ्यास हा मानसशास्त्र, मानववंशशास्त्र अन् प्रतीक.विद्या यांची पुष्टी करीत राहतो, त्यामुळे अशा अभ्यासाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. महाराष्ट्राचा देव्हारा नाना देवतांनी गजबजलेला आहे. ही दैवते जशी वेगवेगळ्या जाती.जमातींची आहेत तशी अनेक वैशिष्ट्यांनी ती सजलेली आहेत. या दैवतांच्या भोवती अद्‌भुतेचे गूढ वलय असते, त्यामुळे समग्र स्वरूपात या दैवतांच्या उपासना स्वरूपाचा शोध घेणे फार कठीण आहे. असे असले तरी यांची अनेकांना अनिवार ओढ, औत्सुक्याची भावना असते. समाजाच्या भक्तींचा विषय बनलेल्या या लोकदैवतांच्या स्वरुपाची प्रकट चिकित्सा करणे, ही नाजूक बाब असल्याची मला जाणीव आहे. समूहमनाच्या निष्ठा एखाद्या श्रद्धा केंद्राशी दृढतेनं निगडीत झालेल्या असतात, तेव्हा त्या श्रद्धा विषयी चिकित्सा करण्याचे काम अधिक हळुवार बनते. प्रामाणिकपणे सांगायचे झाले तर या विषयाचा अवाका मोठा आहे. या असंख्य दैवताचं त्यांच्या उपासना स्वरुपाचं निरीक्षण.परीक्षण करणं अन् त्यातून मराठी समाजाच्या आंतरिक आंदोलनांचे स्वरूप जाणून घेण हा मोठा रंजक अन् उद्‌बोधक विषय आहे.

लोकवाङ्मयाच्या विविध प्रकारांतून समाजजीवन अभिव्यक्त होत असते. ही निर्मिती अनामिकांची असते, परंतु तो सर्व समुदायाचा हुंकार असतो. कोणत्याही भाषेत लिखित साहित्याची निर्मिती होण्यापूर्वी मौखिक परंपरेने चालत आलेले लोकसाहित्य अस्तित्वात असते. त्यामुळे लिखित साहित्याबरोबर मौखिक परंपरेतील लोकसाहित्याचाही अभ्यास आवश्यक ठरतो. भारतीय समाज कथाप्रिय आहे. या कथावाङ्मयाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी भाविकांची आहे. कथाकथान आणि कथाश्रवण पुण्यप्रद समजले जाते. अशी समजूत लोकांमध्ये प्राचीन काळापासून रूढ आहे. लोककथेची निर्मिती अनेक मुखांनी झालेले आहे. लोककथेचा एक संपन्न आणि काहीशा निराळ्या स्वरुपाचा प्रकार म्हणजे दंतकथा. वैदेही कोळेकर यांनी दंतकथांना 'लोकसंस्कृतीचे वाहकष संबोधले आहे. लोककथा, दंतकथा किंवा आख्यायिका, अनुभव कथा असे स्थूलमानाने लोककथांचे तीन प्रकार लिंडा डेघ ह्यांनी मानले आहेत. दंतकथा मूळात स्थानिक असली तरी तिचे

लोकवाङ्मयाच्या अभ्यासकांनी दोन वर्ग केले आहेत. 1. भटकी दंतकथा (चळसीरीींू ङशसशपव) 2. स्थानिक दंतकथा (ङेलरश्र ङशसशपव) जगभराच्या लोकवाङ्मयात अगणित दंतकथा आढळतात. यासंदर्भातील डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. गंगाधर मोरजे, डॉ. शरद व्यवहारे इ. पूर्वसुरींच्या विचार अभ्यासने महत्त्वपूर्ण आहे. लोकजीवनात आख्यायिकांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. दंतकथेला इंग्रजीमध्ये मङशसशपवीफ, संस्कृतमध्ये 'आख्यायिकाष हिंदी भाषेत 'अवदानष अशी संज्ञा आहे. शब्दकोशातील अर्थानुसार 'आख्याष म्हणजे अखंड, संपूर्ण आणि आख्यायिका म्हणजे दंतकथा होय. लोकजीवनात मौखिक परंपरेने चालत आलेली, प्रसिध्द अशी पारंपरिक गोष्ट, कहाणी, जिचा आधार एखादी घडलेली सत्य घटना.प्रसंग असतो, मात्र तिचा लवचिकता हा विशेष असल्यामुळे मौखिक परंपरेने (जनश्रुती) ती संक्रमित स्वरुपात नकळत बदलत असते. तिला आख्यायिका म्हणावे असे मला वाटते. 'सोडतीन औटपीठाविषयीची दंतकथा अशी आहे ...ष असे म्हणण्याऐवजी लोकसमूहात 'सोडतीन शक्तिपीठाविषयीची आख्यायिका अशी आहे ...ष असे म्हटले जाते. ह्या सहज उत्स्फूर्त संवादात 'आख्यायिकाष ही संज्ञा सर्वसामान्यपर्यंत पोहचलेली, लोकजीवनात रूढ असल्याचे दिसून येते. कांही शब्द, संज्ञा कालमानानुसार किंवा त्यांची गरज न भासल्याने काळाच्या उदरात गडप होतात. परंतु जनमानसाच्या लोकभाषेत आजही 'आख्यायिकाष हीच संज्ञा दृढ असल्याचे आढळून येते.

**संकेत शब्द** : औटपीठ,आख्यायिका, दंतकथा ,लोकबंधात्मक अभ्यास, मानसशास्त्रीय दृष्टीकोन

**उद्दिष्ट :**

1. साडेतीन शक्तिपीठांचे मूळ स्वरुप, त्यांच्या संबंधीच्या आख्यायिका, त्यांचे यात्रा, उत्सव आणि त्यांची वैशिष्ट्ये यांचा अभ्यास करणे.
2. आख्यायिकांमध्ये आढळणारे लोकतत्त्व. तत्कालीन प्राचीन परंपरा, लोकजीवनाचे धार्मिक पैलू, प्रादेशिकता व त्यांचा जनमानसावरील पडलेल्या प्रभावाचा शोध घेणे.
3. मातृदेवतांचे उत्सव आणि आख्यायिकांमधील साम्य व वेगळेपण सकाराण शोधणे.
4. मराठी आख्यायिकांचा सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि वाङ्मयीन दृष्टीने अभ्यास करणे.
5. मौखिक तसेच लिपीबध्द आख्यायिकांचा भाषिक दृष्टीने अभ्यास करणे.
6. तत्कालिन समाजव्यवस्था, लोकमानस, लोकश्रध्दा आणि जागतिकीकरणामुळे विकसित झालेला विश्वमानव यांच्यामधील बदलत्या मूल्यव्यवस्थेचे परीक्षण करणे.
7. आदिशक्तींचे उत्सव आणि आख्यायिकांच्या अध्ययनातून महाराष्ट्राचे दक्षिण भारताशी असलेले आंतरसंबंध दृढ करणाऱ्या सांस्कृतिक सामरस्यांचा शोध घेणे.

**गृहितके :**

1. मातृतत्वाचे अथवा आदिशक्तीचे विराट स्वरुप स्थिरचराला व्यापून राहिले आहे.
2. आदिशक्तीच्या उपासनेत आणि सण.उत्सवामधील विविधतेही एकात्मतेचे स्वरुप दिसते.

3. लोकसंस्कृतीचे उपासक आणि त्यांच्या मौखिक गीतामध्ये प्रतिभा आणि सर्जनशीलता आढळून येते.
4. संकलित लोकसाहित्याचे भारताच्या सांस्कृतिक इतिहासच्या संदर्भात महत्त्वपूर्ण स्थान आहे.
5. आख्यायिकांचे वाङ्मयीन सौंदर्य वैशिष्ट्यपूर्ण आहे.

**साहित्याचा आढावा :**

लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व आता जवळपास जागतिक स्तरावर सर्वमान्य झाले आहे. जगात वेगवेगळ्या देशात लोककथा प्रचलित आहेत. अनेकवेळा एकाच लोककथेचे वेगवेगळ्या देशातील लोककथांमध्ये वेगवेगळे पर्याय आढळतात. अनेकवेळा या लोककथामधून आढळणारे आदिबंध आणि कल्पनाबंध यामध्ये तर जागतिक पातळीवर आश्चर्यकारक साधर्म्य आढळते. मराठीतील लिपीबध्द तसेच मौखिक आख्यायिकांच्या आशयातून परिसराच्या प्राचीन इतिहासाबरोबर तेथील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, नैतिक लोकजीवनाचे प्रतिबिंब उमटल्याचे आढळते. आख्यायिका कालसापेक्ष व परिस्थितीसापेक्ष बदल स्वीकारत वर्तमानात सुध्दा घडत असतात. आख्यायिकातून प्रदेश विशेष (प्रादेशिकता) जाणवतात. आख्यायिकामधून प्राचीन परंपरा, भाषा विशेष, तत्कालीन समाजजीवन, समजुती, संस्कृतीचा इतिहास यांचा वेध घेवू शकतो. लोकजीवनाचे धार्मिक पैलू, भावभावना, लोकमानस या अंगाने आख्यायिकांचा मानसशास्त्रीय (झीूलहेश्रेसू) दृष्ट्याही अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांचे उत्सव आणि आख्यायिकांचा लोकबंधात्मक अभ्यासातून समाजजीवनातील रूढी, प्रथा, परंपरा, आचारविचार, संस्कृती, भाषा, सवयी, समजुती, विधी प्रकट होताना दिसतात. तत्कालीन बोली भाषेची वैशिष्ट्ये अवशेषरुपात का असेना आख्यायिकांमधून प्रतिबिंबित झालेली असतात. त्यामुळे आख्यायिका म्हणजे गतसंस्कृतीचा इतिहास आहे. अनेक विद्वानांनी मराठी लोकसाहित्याचे संकलन आणि संपादन विपुल केले. मात्र संकलन करताना संकलनकारांनी जेवढी वाङ्मयीन दृष्टी ठेवायला हवी तेवढी ठेवलेली दिसत नाही. सदरच्या शोधनिबंधात मराठी आख्यायिकांचा भाषिक, सामाजिक, आणि वाङ्मयीन गुणवत्तेच्या दृष्टीने परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधन पध्दती :**

महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांचे उत्सव आणि आख्यायिकांचा अभ्यास ह्या शोधविषयाच्या अभ्यासासाठी संकलनाची क्षेत्रीय आणि स्तरीय संशोधन पध्दतींचा स्वीकार केला असून शोधनिबंधाच्या पूर्णत्वासाठी लिपीबध्द तसेच ध्वनिमुद्रणाच्या साहाय्याने संकलित केलेल्या महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांच्या मौखिक तसेच लिखित मराठी आख्यायिकांचा वाङ्मयीन दृष्टीने अभ्यास केला आहे. मुलाखती आणि प्रश्नावली तंत्राच्या वापरा समवेत संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, शब्दकोश, मराठी विश्वकोश, भारतीय संस्कृतिकोश, देवीकोश, दूरध्वनी, इंटरनेट इ. पारंपरिक तसेच आधुनिक संदर्भ साहित्याचीही मदत घेण्यात आली आहे.

**प्रस्तावना :**

आज आपले जीवन अतिशय गतिमान झाले आहे. वैज्ञानिक दृष्टिकोणाच्या प्रभावामुळे जुन्या देवधर्मावरील आपला विश्वास कमी होत आहे. परंतु धावपळीच्या, दगदगीच्या, संघर्षाच्या जीवनात आपण आधारही शोधीत आहोत. कर्मकांडास व व्रतवैकल्यास नावे ठेविता आपण पुनः त्यांच्याकडे वळत आहोत. डालड्याच्या डब्यात तुळस लावणारी मुंबईतील स्त्री अन् शहरात वडाचा शोध घेता येणार नाही म्हणून चित्रातील वडाची पूजा करणारी सुवासिनी आज सुध्दा दिसून येते. याचे कारण असे की, मनुष्य हा अगतिक आहे, श्रध्दाळू आहे, जुन्या परंपरेच्या दोऱ्यास भक्कम धरून ठेवणारा आहे.

मी मूळ खेड्यातला. माझं बालपण ग्रामीण भागात आणि शेतीनिष्ठ जीवनासोबत गेलं. त्यामुळे माझ्यात लोकसाहित्याच्या अभ्यासाची कच्ची सामग्री मला नकळत्या वयातच मिळाली. ग्रामीण भागातील पारंपरिक रीतिरिवाज, चालीरीती, रूढी. परंपरा, श्रध्दा.अंधश्रध्दा, तेथील लोकांचे मातीशी असणारे नाते, त्यांचे दैनंदिन व्यवहार, बोलीभाषा, सवयी, ग्रामोत्सव, बदलते समाजजीवन आणि संस्कृती हे मी अगदी जवळून पाहिले व अनुभवले आहे. लोकजीवनाच्या अभ्यासातूनच ग्रंथ निर्माण होतात. जागतिकीकरणामध्ये या लोकवाङ्मयाकडे दुर्लक्ष होत असले तरी अशा माहितीचे संवर्धन करणे, वाङ्मयीन स्वरुपमीमांसा अभ्यासने गरजेचे आहे.

मला विविध कारणामुळे महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठे सातत्याने पाहण्याचा योग आला. लोकसाहित्य अभ्यासाच्या अभिरुचीमुळे नकळत आदिशक्तीचा स्वरुप शोध घेण्याची मला ओढ निर्माण झाली. शक्तिपीठांना भेटी देत असताना उपासकांच्या अनेक मौखिक रचना, भक्तांच्या आख्यायिका नेहमी ऐकावयास मिळत. मातृदैवतांच्या संबंधित संकलित केलेले असे मौखिक लोकसाहित्य लिपीबध्द करून वाङ्मयीन, सामाजिक, सांस्कृतिक तसेच लोकबंधात्मक दृष्टीने महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांचे उत्सव आणि आख्यायिकांचा तपशीलवार अभ्यास करणे गरजेचे आहे. कोणत्याही भाषेत लिखित साहित्याची निर्मिती होण्यापूर्वी मौखिक परंपरेने चालत आलेले लोकसाहित्य अस्तित्वात असते. लखित आणि मौखिक अशा दोन्ही परंपरेतील साहित्य अभ्यासाने लोकसाहित्याचा समग्र अभ्यास करण्यात येतो. सदर शोधनिबंधाचा आशय व आवाका मोठा आहे. परंतु शब्दमर्यादांचे भान ठेवून तो मांडण्याचा प्रयत्न करतो.

1.श्रीमहालक्ष्मी उत्सव आणि आख्यायिकांचे स्वरुप विशेष

करवीर निवासिनी श्रीमहालक्ष्मी महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक भारतीय ख्यातीच्या शक्तिपीठाची अधिष्ठात्री देवता आहे. कोल्हापूर हे दक्षिण महाराष्ट्रातील क्षेत्र महाराष्ट्र . कर्नाटकाच्या सीमेला लागून असल्यामुळे तेथील महालक्ष्मीच्या भक्तीचा प्रसार हजार.बाराशे वर्षापूर्वीपासून कर्नाटकाच्या सर्व भागात झालेला दिसतो. दक्षिणेतील अनेक क्षेत्रांना ‘दक्षिणकाशी’ म्हणून गौरवले जाते. त्यात कोल्हापूरची प्रसिध्दी लक्षणीय आहे, अनेक घराण्यांची ही कुलदेवता आणि दक्षिणकाशी म्हणून प्रतिष्ठा पावलेले तिचे करवीर क्षेत्र ,‘करवीर’ या नावाविषयीच्या आख्यायिकांचा आढावा अभ्यासणे महत्त्वपूर्ण आहे. येथील महालक्ष्मी मंदिरास लोक ‘अंबाबाईचे देऊळ’ या नावाने संबोधतात याचे प्रतिबिंब लोकसंस्कृतीच्या उपासकांच्या लोकगीतात जाणवते.

महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील श्रीमहालक्ष्मीचे मंदिरे, नवरात्र आणि दसरा महोत्सवाचे स्वरुप, श्रीमहालक्ष्मीविषयीच्या आख्यायिकाची वैविध्यता तसेच आरती व स्त्री गीतातील महालक्ष्मी वर्णन ह्यांची सोदाहरण चिकित्सा अभ्यासणे आवश्यक आहे.

3.श्रीरेणुका उत्सव आणि आख्यायिकांच्या आशयाचे स्वरुप

माहूरगडची 'श्रीरेणुकाष ही महापराक्रमी परशुरामाची माता असून हिलाच 'एकवीराष, 'भगवतीष, 'यल्लमाष असेही संबोधले जाते. या देवीची मूर्ती नसून फक्त 'तांदळाष म्हणजेच मुखवटा आहे. हिची मुद्रा उग्र आहे. श्रीरेणुका ही अनेकजणांची कुलस्वामीनी आहे. मराठवाडा, विदर्भ आणि आंध्रप्रदेशाचे सरहद्द मातापूर (माहूर) म्हणून जनलोकात या ठिकाणाचा लौकिक आहे. नांदेड जिल्ह्याच्या किनवट तालुक्यातील हे एक ठिकाण आहे. रेणुकामातेच्या मदिराचा परिसर घनदाट अरण्याने आणि दऱ्या.खोऱ्यांनी गजबजलेला असून या परिसरात महालक्ष्मी, तुळजाभवानी, परशुराम, दत्तात्रेय आदी दैवतांचेही वास्तव्य आहे. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील श्रीरेणुकेची आढळणारी मंदिरे, दीपोत्सव, रथोत्सव, नवरात्रोत्सवाचे स्वरुप, लोकमानसात स्थिरावलेले श्रीरेणुकेचे माहात्म्य याविषयीची विस्तृत चर्चा होणे गरजेचे आहे. जोगता.जोगतीण तसेच अनेक उपासकांच्या मौखिक रचनांची तसेच लोककथागीतांची वाङ्मयीन, सामाजिक दृष्टीने मीमांसा तसेच श्रीरेणुका मंदिर आणि मूर्ती विषयीच्या आख्यायिका, अवतार कथा, श्रीरेणुकेचे लोककथात्मक चरित्र, जमदग्नी व रेणुका यांच्या विषयीच्या पौराणिक कथा तसेच स्त्री ओवीगीतातील श्रीरेणुका आणि परशुराम ह्यांची वर्णने अभ्यासनिय आहेत.

4. श्रीतुळजाभवानी उत्सव आणि आख्यायिकांचे स्वरुप विशेष

देवीभागवतातील शक्तिपीठ नामालीत तुळजापूरचा तिसरा क्रमांक असून तुळजाभवानी हे तीर्थक्षेत्र उस्मानाबाद जिल्ह्यात असून तुळजापूर नावाच्याच तालुक्याचे मुख्य केंद्र आहे. सप्तशतीत साकारलेले तिचे महिषमर्दिनी. रुप ज्ञानदेवांच्या नितांत श्रध्देचा विषय बनून राहिले होते आणि सतराव्या शतकात ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या ध्यानी.मनी स्वप्नी भरून राहिले होते. त्यांनी केलेला अफझलखानाचा वध हा महिषमर्दिनी श्रीतुळजाभवानीने केलेला महिषासुराचाच वध आहे. अशा श्रध्देनेच शिवकालीन शाहिरांनी, कवींनी, बखरकारांनी या घटनेचे वर्णन केले आहे. एकोणिसाव्या.विसाव्या शतकांतील राष्ट्रजागृतीसाठी प्रेरणा देणाऱ्या रचनांतही या श्रध्देचा वापर उत्कृट श्रध्देने कसा केला असून अर्थात् देवीतत्त्वाने भारलेल्या एका प्राचीन मिथकाने महाराष्ट्रात आणि संपूर्ण भारतातही आपल्या आत्यंतिक प्रेरक शक्तीच्या बळावर क्रांती घडविली,भवानीच्या या अंर्तबाह्य प्रेरकतेचा वेध घेणे गरजेचे आहे. महाराष्ट्राची कुलस्वामीनी श्रीतुळजाभवानी देवीच्या तुळजापूर येथील प्राचीन मंदिरामुळे उस्मानाबाद जिल्ह्यास आगळे महत्त्व प्राप्त झालेले आहे. श्रीतुळजाभवानीच्या उत्सव परंपरेला महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात महत्त्वपूर्ण स्थान आहे. तुळजापूर शिवशक्तीचे तीर्थक्षेत्र आहे. शिवलिंग मस्तकी धारण केलेल्या देवीच्या नवरात्रोत्सवाला असंख्य लोक उपस्थित असतात.

पहिली माझी ओवी गं ऽ ऽ जगाच्या निर्मित्याला

आदि परमात्म्याला गाते मनोभावे.

दुसरी माझी ओवी गं ऽ ऽ शिव नि शक्तीला

दोन्ही हात जोडुनी नमस्कार दोघाला

विश्वनिर्माता एकच असल्याने ओवीकर्ती त्या शक्तिला निर्माता म्हणते. अशा अनेक ओव्यांची सोदाहरण चिकित्सा केली आहे. सर्व मानवसमाज हा एकच असून विश्वाचा निर्माताही एकच आहे. शिव आणि शक्ती पासून सर्व मानवजात निर्माण झाल्याने दुसऱ्या ओवीत या दोन्ही शक्तींना तिने मनोभावे नमस्कार केला आहे. स्त्रीच्या प्राकृतिक सर्जक शक्तीबरोबरच रक्षक आणि असुर.संहारक शक्तीही माणसाला स्त्रीमध्ये दिसल्या असतील. देवता रुपातली स्त्री ‘अ.बलाष नाही, ती सर्वश्रेष्ठ ‘शक्तीष आहे. ती समर्थ आहे. शरीर, मन, बुध्दी या सर्व दृष्टींने ती ‘स्व.तंत्रष आहे. यात्राकाळात महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रप्रदेश या राज्यातील लक्षावधी भाविक मोठ्या श्रध्देने सहभागी होतात.

‘नवरात्र महोत्सवष हा महाराष्ट्रातील महत्त्वाचा सण असून या काळात शाक्तदेवतांच्यापुढे घटस्थापना केली जाते. ‘घटष हे फलनाचे प्रतीक असल्यामुळे आणि बहुजनांच्या या सर्वच देवता मातृदेवता असल्याने त्यांच्याशी या घटाचा संबंध असतो. शेतकऱ्यांचा एक हंगाम संपून दुसऱ्या हंगामाचे बी धरणीमातेच्या कुशीत पेरल्यामुळे शेतकरी वर्ग या मातृदेवतांची मनोभावे पूजा करून या घटांच्यामार्फत अन्नधान्यांची भरभराट व्हावी अशी अपेक्षा या नवरात्र महोत्सवात देवी अंबाबाईकडे आणि तिच्या निरनिराळ्या रुपातील देवी.देवतांकडे करीत असतो. आश्विनी नवरात्र, पौषातील शाकंभरीचे नवरात्र आणि चैत्री पौर्णिमा हे तुळजापूर येथील मुख्य महोत्सव असतात. मंगळवार, शुक्रवार, प्रत्येक महिन्याची पौर्णिमा, गुढीपाडवा, बलिप्रतिपदा, मकरसंक्रांत, रथसप्तमी आणि नवरात्रातील सर्व दिवस हे भवानीच्या छबिन्याचे गाजणारे दिवस असतात. नवरात्रात गरुड, मोर, वाघ, सिंह अशा वाहनांची दृश्ये वापरून निघणारा छबिना भावभाविकांच्या नजरेचे पारणे फेडणारा असतो. लोकांचे नवससायास, पूजापुरस्कार, दंडवते, लोटांगणे, पारंपरिक लोकसंस्कृतीच्या उपासकांच गायन.वादन यांनी देवीचा मंदिर परिसर सतत गाजत असतो.

आदिमायेच्या उपासकांच्या परंपरेत भुत्या, भुप्या, आराधी ही गोंधळ्याप्रमाणेच देवीचा गोंधळ घालतात. गोंधळ्याच्या परंपरेत डवरी आणि पोतराज यांचाही आदिशक्तीचे उपासक म्हणून समावेश होतो. त्याच्या या गाण्यातून देवीचे गुणवर्णन, रुपवर्णन, तिचे लीलावर्णन, प्रकट होत असते. लोकसंस्कृतीचे उपासक देवदेवतांच्या उपासनाविधी प्रसंगी आणि नवरात्रात उदरनिर्वाहासाठी भिक्षा मागताना गाणी म्हणतात. रचनेच्या दृष्टीनेही त्यांच्या गाण्यात आढळणाऱ्या वैविध्यपूर्ण कंगोरे आढळतात. सीतारुपधारिणी पार्वतीच्या आख्यायिका, इच्छापूर्तीच्या आख्यायिका, अद्‌भुत प्रसंगांच्या आख्यायिका,पूजाविधीसंदर्भातील आख्यायिका, ‘दर्शन सुलभताष सांगणाऱ्या आख्यायिका, अवतार कथनाच्या आख्यायिका, पौराणिक आख्यायिका, व्रतकहाण्या, रुढी, समजूती संबंधीच्या आख्यायिकांची अशी विविध विषय, सकस असे आशय असणाऱ्या उपलब्ध आख्यायिकांची विभागणी अभ्यासाच्या सोयीसाठी करून त्यांची सोदाहरण चिकित्सा आपणास करता येते.

राम.सीतेच्या वनवासाच्या निमित्ताने भारतभरच्या विविध भागात आख्यायिका निर्माण झाल्या आहेत. प्रत्यक्ष इतिहास काहीही असो, भारतीय लोकमानसाने वनवासाच्या निमित्ताने राम.

सीतेला सगळीकडे हिंडवले आहे. या कथा प्रत्येकाला बहुधा मौखिक स्वरुपात माहीत झालेल्या असतात. त्यांचा ठसा भारतीय समाज मनात फार खोलवर ठसलेला आहे. या ग्रंथाच्या ग्रांथिक परंपरेपेक्षा लोकपंरपरा अधिक बलवत्तर आहे. पिढयान् पिढ्या मौखिक परंपरेतून त्या हजारो वर्ष प्रवाहित झाल्या आहेत. कथनकाराच्या कौशल्याने त्यात भर.घट केली आहे. लोकप्रतिभेतून एकाच कथेच्या अनेक रुपांचा पसारा सिध्द झाला आहे. तो बहुधा तोंडा.तोंडीच आहे. काही हस्तलिखीत स्वरुपात उपलब्ध आहे. काहींचे अलीकडच्या अभ्यासकांनी संकलन केले आहे. भारतभरच्या विविध प्रादेशिक भाषामधून रामकथेची अनेक मौखिक रुपे आजही विद्यमान आहे. लोकप्रतिभा ही त्यांची जननी आहे आणि येथील समूहमानस ही तिची प्रेरणा आहे. रामकथेतल्या घटना.प्रसंगांशी आणि व्यक्तिमत्वांशी भारतीय लोकमन विलक्षण तादात्म्य पावल्याचा प्रत्यय अशा अनेक आख्यायिकांतून, श्रध्दा समजुतीतून येतो. लोकस्मृतीने जतन केलेल्या, काही स्थळकाळांशी बध्द असलेल्या मौखिक परंपरेने चालत आलेल्या अनेक आख्यायिका, समजुती, कथा यातूनही रामायणाचा आविष्कार होत राहिला आहे. महिषासुर युध्द प्रसंग, तीर्थाविषयीच्या पौराणिक आख्यायिका संकलित करून आशय विश्लेषण वस्तुनिष्ठपणे अभ्यासणे आवश्यक आहे.

5. सप्तशृंग निवासिनी श्रीजगदंबा उत्सव आणि आख्यायिकांचे स्वरुप

सप्तशृंगी डोंगरातील वणी हे गाव नाशिक जिल्ह्यात आहे. या डोंगराला सात शिखरे किंवा टोके असल्यामुळे त्याला ‘सप्तशृंगष असे म्हणतात. हा डोंगर ‘वणीचा डोंगरष म्हणूनही विख्यात आहे. कोल्हापूर, माहूर उर्फ मातापूर, तुळजापूर येथील तीन देवता म्हणजे सप्तशृंग निवासिनीच्या प्रतिमाच समजल्या जातात अशी लोकश्रध्दा आहे. ‘सप्तशतीष, ‘गिरीजा पुराणष, ‘सप्तशृंगष, ‘पाठावलीष, ‘बालबोधष इ. पौराणिक ग्रंथात श्रीजगदंबाचे माहात्म्य आणि पराक्रम वर्णिलेले आहे. जे विषय मानवी श्रध्दाविश्वाशी निगडीत असतात, त्या विषयांचे आकलन माणसांच्या सामूहिक श्रध्दाविश्वाच्या गाभ्यात आस्थेने प्रवेश केल्यावरच घडू शकते, हा जगातल्या सर्व जबाबदार धर्मेतिहासज्ञांचा अनुभव आहे. माणूस केवळ बुध्दिजीवी प्राणी नाही; केवळ तर्काच्या आधारे तो जगू शकत नाही. माणसाचे सार्थ जगणे हे बुध्दीने, विवेकाने अंकित असलेल्या भावनांवरच आधारलेले असते. म्हणूनच भावसत्ये ही तर्काधिष्ठित वास्तवापेक्षा अधिक प्रबळ असतात, अधिक प्रभावी असतात, अधिक प्रेरक असतात. मिथकांची प्रभावक्षमताही भावसत्यांवरच आधारलेली असते. सर्जक महासरस्वती, संगोपक महालक्ष्मी आणि संहारक महाकाली अशी त्रिरुपा भगवती आपापल्या जगण्याच्या कक्षेत भाविकांनी पूजली, गायली आहे. प्राचीन वाङ्मयातील श्रीजगदंबा उल्लेख, नवरात्रोत्सव, श्रीसप्तश्रृंगीच्या पराक्रमकथा, माहात्म्य वर्णनपर तसेच कुंडाविषयीच्या आख्यायिका, अहिराणी बोलीतील गाणी, स्त्रीगीते ह्यांची सविस्तर आपणास करता येते.

6. चर्चा व विश्लेषण :

महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांचे उत्सव आणि त्याविषयीच्या वैविध्यपूर्ण गद्य आणि पद्य स्वरुपातील आख्यायिकांच्या संहितांचे आशय विश्लेषण, स्वरुप विशेषांचा शोध वाङ्मयीन गुणवत्तेच्या दृष्टीने घेतला आहे. आख्यायिकांना रचनातंत्राचे बंधन किंवा ठरीव साचा नसतो. माहिती असलेली घटना, प्रसंग सांगून झाला की आख्यायिका संपते. सामाजिक सुख, दुःख, विधी.

विधाने, कुलाचार याचा आशय आख्यायिकांनी, टिपला आहे. आख्यायिकांमध्ये ग्रामीण बोलीभाषा, अतिशयोक्ती, पाल्हाळिकता, म्हणी, पौराणिक संदर्भ, दाखले, निवेदनशैली यांचा वापर करून कथ्थक भक्तांच्या मनाचा ठाव घेताना दिसतो. आख्यायिका जपून ठेवणाऱ्या मानव समाजाचे मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून (झहूलहेश्रेसळलरश्र झर्शीीशिलीेंर्ळीश) विश्लेषण केल्यास नवीन धागेदोरे सापडू शकतात. देवदेवतांचे प्रत्यक्ष मानवी रूप पाहिले नसले तरी लोकदैवतावरील विश्वास, कल्पनाशक्तीच्या आधारे प्रतिमा रेखाटन, त्याच्याविषयी मनात खोलवर रूजलेल्या संकल्पना, भीतीबरोबर भक्तीची ओढ, श्रद्धेतील निष्पाप भावना आख्यायिकेतून स्पष्ट होतात. त्यामुळे लोकदेवता ही मानवी जीवन परिवाराचाच एक अविभाज्य भाग बनल्याचे जाणवतात. समाजजीवनात दैवतकथा, आख्यायिका, कहाण्या यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. अशा स्वरूपाच्या आख्यायिकांचा संबंध देवाधर्माशी येतो. दैवताविषयक आख्यायिकांतून समाजजीवनाचे दर्शन घडत असते. धर्मभावना जागृत ठेवण्याचे काम दैवतकथा करतात. लोकसंस्कृतीच्या उपासकांची मौखिक गीतरचना स्मरणशक्तीच्या आधारावर, पाठांतराच्या बळावर संक्रमित स्वरुपात आल्याचे आढळते. देवीची यात्रा, नवरात्र या प्रसंगी ऐकावयास मिळणारे हे लोकवाङ्मय अक्षरबध्द करणे अत्यावश्यक आहे. अभ्यासकांनी या गीतांचे संकलन आणि संशोधन केलेले असूनही या मौखिक गीतांचा साठा मोठा आहे.

**निष्कर्ष :**

पौराणिक आख्यायिका, कहाण्या, ओवी.आख्याने ही समूहरंजक आहेत. त्यातून धार्मिक भावभावनांचे भरणपोषण प्रामुख्याने केल्याचे दिसून येते.  मराठी आख्यायिकांतून धार्मिक, सामाजिक, ऐतिहासिक घटनाप्रसंग, लोकसंस्कृतीबरोबरच लोकजीवनाचे स्मृतिरूपाने केलेले जतन महत्त्वपूर्ण आहे. सामाजिकता, सांस्कृतिक विशेष, तत्कालीन समाजाच्या रूढी, प्रथा, परंपरा, दैवताविषयक समजुती जाणून घेण्यासाठी आख्यायिका उपयोगी ठरतात. आख्यायिकांच्या आशयाचा सूक्ष्म अभ्यास केला तर त्यामध्ये स्थलपरत्वे, कालपरत्वे, प्रदेशपरत्वे, भाषानुरूप रचनाही बदलताना दिसते. कथा, आख्यायिका, कहाण्यांमधील एकच आशय विविध रूपांमधून संक्रमित होताना दिसतो. परंतु त्यातील कथाबीज कायम राहिलेले आढळते. आख्यायिकांतील घटनाप्रसंगाच्या चित्रणाचे स्वरूप, पात्राचे चित्रण, वातावरणनिर्मिती, भाषिक गुणविशेष, धार्मिक समाजजीवन यांच्या आधारे अभिव्यक्तीच्या वैशिष्ट्यांचा समग्रतेने शोध ह्या प्रकणात घेतला आहे. आदिम मानव ते देव मानव यांचा इतिहास अभ्यासला तर गर्वाने देव दानव बनल्याचे तर नम्रतेमुळे मानव देव बनल्याचे या भूतलावरच घडले. विविध जातीधर्मांच्या लोकांनी वसलेल्या नागर तसेच ग्रामीण जनसमूहात ही लोकदैवतं जातींधर्माच्या मर्यादा ओलांडून लोकमय झालेली दिसतात. लोकमानसातील दैवत परंपरा ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक, ऐतिहासिक, धार्मिक, पौराणिक इतिहासाची अभ्यास.साधनंही आहेत. महाराष्ट्राच्या लोकमानसात जागतिकीकरणाच्या युगातही या दैवतांचे स्थान अढळ आणि अटळ असल्याचे दिसून येते.

संदर्भग्रंथ :

1. रा. चिं. ढेरे, महाराष्ट्राचा देव्हारा, विश्वकर्मा साहित्यालय, पुणे, 1978.
2. वामन देशपांडे, सार्थ श्रीदुर्गा सप्तशती, मनोरमा प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, सप्टेंबर 2006.

3. डॉ. तारा भवाळकर, लोकपरंपरा आणि स्त्रीप्रतिभा, लोकवाङ्मय गृह, मुंबई, तिसरी आवृत्ती, जानेवारी 2008
4. लक्ष्मणशास्त्री जोशी, (संपा.), मराठी विश्वकोश, खंड.2, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, प्रथम प्रकाशन, 1976
5. रा. चिं. ढेरे, लज्जागौरी, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, नोव्हेंबर 2004
6. प्र. कृ. प्रभुदेसाई, देवीकोश, खंड.1, अंजली पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वितीयावृत्ती, आक्टोबर 2005,
7. द.ह. अग्निहोत्री, (संपा.), अभिनव मराठी.मराठी शब्दकोश, भाग पहिला, व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, ऑक्टोबर 1983
8. वासुदेव गोविंद आपटे, मराठी शब्दरत्नाकर, वरदा बुक्स, पुणे, सहावी आवृत्ती, मार्च 1989
9. महादेवशास्त्री जोशी, (संपा.), भारतीय संस्कृतिकोश, खंड.7, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, प्रथमावृत्ती, ऑगस्ट 1972
10. प्रा. श्री. ना. बनहट्टी व इतर, (संपा.), सुगम मराठी शब्दकोश, सुविचार प्रकाशन, मंडळ, नागपूर, पहिली आवृत्ती, जून 1968.
11. ह.अ. भावे, (संपा.), मराठी.इंग्रजी.शब्दकोश, वरदा बुक्स, पुणे, पुनर्मुद्रण 2 रे, जुलै 2001.
12. सिध्देश्वरशास्त्री चित्राव, भारतवर्षीय प्राचीन चरित्रकोश, भारतीय चरित्रकोश मंडळ, पुणे, द्वितीय आवृत्ती, एप्रिल 1968
13. कृ. पां. कुलकर्णी, मराठी व्युत्पत्ति कोश, शुभदा सारस्वत प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, 1993
14. डॉ. विजया वाड, (संपा.), मराठी विश्वकोश, खंड.17, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, प्रथम प्रकाशन, 2007
15. गजानन शं. खोले, आदिशक्तीची साडेतीन पीठे, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर 2008
16. रा. चिं. ढेरे, लोकदैवतांचे विश्व, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, जुलै 2007
17. प्रा. नवनाथ शिंदे, माणकेश्वरचे शिव.सटवाई, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, जानेवारी 2011
18. डॉ. तारा भवाळकर, लोकसाहित्य, य.च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रथम प्रकाशन, 1992
19. डॉ. प्रभाकर मांडे, लोकसाहित्याचे स्वरुप, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती तिसरी, 1995
20. डॉ. प्रभाकर मांडे, लोकसाहित्याचे अंतःप्रवाह, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती तिसरी, 2008
21. डॉ. विश्वनाथ शिंदे, लोकसाहित्यमीमांसा (भाग पहिला), स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, 1998
22. डॉ. विश्वनाथ शिंदे, 'मराठी दंतकथांचा सामाजिक दृष्टीने अभ्यास', लघुसंशोधन प्रकल्प, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, 1994.96